स्वातंत्र्य सैनिकांना बँकेमार्फतच पेन्शन अदा करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन,
सामान्य प्रशासन विभाग,
परिपत्रक क्रमांक: संकीर्ण-१०९७/प्र.क्र. ५९/९७/स्वासैकक्ष-१,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक :- १६/२/९८.

वाचावे:- शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक:पीओएस-१०८३/स्वासैक, दि. २२ जुलै, ८६.

परिपत्रक

राज्यातील स्वातंत्र्य सैनिकांना/त्यांच्या विधवांना शासनातर्फे दरमहा स्वातंत्र्य सैनिक पेन्शन दिले जाते. सध्या काही स्वातंत्र्य सैनिकांना मनीऑर्डरद्वारे पेन्शन पाठविली जाते व काही स्वातंत्र्य सैनिकांना त्यांच्या बँकेतील खात्यामार्फत पेन्शन दिले जाते. ज्या स्वातंत्र्य सैनिकांनी त्यांचे निवृत्ती वेतन बँकेमार्फत स्विकारण्याचा पर्याय स्विकारला आहे. त्यांना त्यांचे निवृत्ती वेतन शासन निर्णय क्रमांक पीओएस-१०८३/स्वासैक, दि. २२.७.१९८६ नुसार देण्यात येते.

२. मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी श्री. काशिनाथ परदेशी विरुद्ध महाराष्ट्र शासन व इतर [रिट पिटीशन क्र. १८२३/१९९७] या प्रकरणामध्ये निकाल देताना राज्य शासनाला असे आदेश दिले आहेत की, यापुढे राज्यातील प्रत्येक स्वातंत्र्य सैनिकांना त्यांचे मासिक पेन्शन बँकेमार्फतच देण्यात यावे व मासिक पेन्शनच्या चेक संबंधीत स्वातंत्र्य सैनिकांच्या खात्यावर वेळोवेळी जमा होईल याचीही राज्य शासनाने खातरजमा करावी.

३. मा. उच्च न्यायालयाचे वरील आदेश लक्षात घेता सर्व जिल्हाधिकारी यांना या परिपत्रकाद्वारे अशा सूचना देण्यात येत आहेत की, यापुढे त्यांनी कोणत्याही स्वातंत्र्य सैनिकांना त्यांचे मासिक पेन्शन रोखीने अथवा मनीऑर्डरने अदा करु नये अथवा त्यांना शासन निर्णय क्रमांक पीओएस-१०८३/स्वासैक, दि. २२.७.१९८६ अन्वये असलेला पर्याय देऊ नये. प्रत्येक स्वातंत्र्य सैनिकाला त्यांच्या राहत्या ठिकाणापासून जवळ असलेल्या बँकेमध्ये खाते उघडण्यास सांगावे व संबंधित स्वातंत्र्य सैनिकांचे मासिक पेन्शन त्यांच्या खात्यामध्ये दरमहा धनादेशाद्वारे भरावे तसेच हे धनादेश संबंधितांच्या खात्यावर वेळोवेळी जमा होतील याबाबतही सर्व जिल्हाधिकाऱ्यांनी दक्षता

[कृ. मा. प]

द्यावी. हे आदेश तात्काळ अंमलात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,

मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,
मा. उपमुख्यमंत्री यांचे सचिव,
मा. मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव/स्वीय सहायक,
मा. सभापती, स्वातंत्र्य सैनिक उच्चाधिकार समिती,
मा. सदस्य सचिव, स्वातंत्र्य सैनिक उच्चाधिकार समिती,
उच्चाधिकार समितीचे सर्व सदस्य,
वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई,
सर्व विभागीय आयुक्त/सर्व जिल्हाधिकारी,
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई,
महालेखापाल, महाराष्ट्र, मुंबई-१,
महालेखापाल, महाराष्ट्र, नागपूर-२,
सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,
स्वातंत्र्य सैनिक कक्ष-२ व ३,
निवड नस्ती.